महाराष्ट्र शासन

# प्रवेश नियामक प्राधिकरण

८वा मजला, न्यु. एक्सलसियर बिल्डींग,
ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१

दूरध्वनी : ०२२ - २२०१ ६१५९

वेबसाईट : http://www.maha-ara.org
ईमेल : maharashtra.ara@gmail.com

क्र. संकीर्ण/प्र.नि.प्रा/प्र.प्र.प.का/७६६०/ २०१८ दिनांक :२६/११/२०१८

प्रति,

१) अधिष्ठाता/प्राचार्य,
सर्व खाजगी व विनाअनुदानित तसेच शासकीय अनुदानित संस्था,
व्यावसायिक अभ्यासक्रमांची महाविद्यालये,
महाराष्ट्र राज्य.

२) संचालक तथा नोडल अधिकारी,
वैद्यकीय शिक्षण/तंत्रशिक्षण/उच्चशिक्षण
आयुष/कला/कृषी/माफसू

**विषयः- शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रवेश प्रक्रिया पडताळणीचे कामकाज संगणकीकृत प्रणालीने करण्याबाबत.**

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ प्रवेश नियामक प्राधिकरणाकडील प्रवेश प्रक्रियेच्या पडताळणीचे कामकाज संगणकीकृत प्रणालीने करण्याकरीता **www.safalta.org** हे नवीन संकेतस्थळ तयार करण्यात आले आहे. सर्व खाजगी/ विनाअनुदानित तसेच शासकीय/अनुदानित व्यावासायिक अभ्यासक्रमांच्या संस्था/ महाविद्यालयांना सदर संकेतस्थळावर नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्याकरीता दि.०६/०९/२०१८ ते दि.३०/०९/२०१८ पर्यंत मुदत देण्यात आली होती.

सदर मुदतीस दि.१०/१०/२०१८ ते दि.१४/१०/२०१८ व दि.०१/११/२०१८ ते दि. ०५/११/२०१८ अशा दोन वेळा नोंदणी करण्यासाठी विनाशुल्क मुदतवाढ देण्यात आली होती. तथापि काही संस्था/ महाविद्यालयांनी नोंदणी न केल्याचे दिसून आल्याने दि.१६/११/०१८ ते दि.१९/११/२०१८ या कालावधीत विलंब शुल्कासहित नोंदणी करण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली होती.

वरील चार मुदती नंतरही अद्याप काही संस्था/ महाविद्यालयांनी नोंदणी केल्याचे दिसून येत नाही. सदर संस्था/ महाविद्यालयांची संचालक निहाय यादी सोबत जोडली आहे. सदर महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशाला प्राधिकरणातर्फे मान्यता देण्यात येणार नाही. तसेच मान्यतेअभावी सदर विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाल्यास याची सर्व जबाबदारी संबंधीत संस्था/ महाविद्यालयांची असेल याची कृपया सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

(आ.ए.रायते) भा.प्र.से.
**सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण,मुंबई**

सोबत

१) कसुरदार महाविद्यालयांची यादी माहितीकरीता सादर.

D:\rutuja\Rutuja\Malekar Sir\kalp tech letter 22-11-2018.docx